महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
जावक क्रमांक : मआ/द/1865
दिनांक: 17/09/2020

कार्यालयीन आदेश

विषय - पूर्वगणनपत्रकांचे तपासणी व तांत्रिक मान्यतेबाबत

शहर विकासाच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेमार्फत महत्वाचे व मोठे प्रकल्प राबविणेत येतात. सदरच्या महत्वाच्या प्रकल्पांची आखणी करताना व त्या अनुषंगाने आवश्यक ती पूर्वगणनपत्रके तयार करताना या प्रकल्पांच्या विकास कामांसाठी लागणारा कालावधी, येणाऱ्या तांत्रिक अडचणी, भविष्यात उद्भवणाऱ्या विविध गरजा, कामाची गुणवत्ता च दर्जा अबाधित राहणे बाबत घ्यावयाची काळजी , एखाद्या प्रकल्पामुळे दुसऱ्या प्रकल्पावर होणारे संभाव्य परिणाम, इ. बाबतचे महत्वाचे व सर्वांगीण निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी खालील तक्यात नमूद केल्याप्रमाणे पूर्वगणनपत्रकांच्या तांत्रिक मान्यतेचे अधिकार सुपूर्त करण्यात येत आहेत.

अ.क्र.	अधिकाऱ्याचा हुद्दा	पूर्वगणनपत्रक तांत्रिक मान्यता मर्यादा
१	उप अभियंता	रक्कम रुपये १० लक्ष पर्यंत
२	कार्यकारी अभियंता	रक्कम रुपये १० लक्षच्या वर २० लक्ष पर्यंत
३	खातेप्रमुख	रक्कम रुपये २० लक्षच्या वर १०० लक्ष पर्यंत
४	एस्टिमेट कमिटी संबंधित विभागाचे अतिरिक्त महापालिका आयुक्त - अध्यक्ष शहर अभियंता - सह अध्यक्ष सर्व मुख्य अभियंता - सदस्य सर्व अधिक्षक अभियंता व संबंधित उपआयुक्त - सदस्य अधिक्षक अभियंता (भवन) - सदस्य सचिव	रक्कम रुपये १ कोटीच्या वर २५ कोटी पर्यंत
५	एस्टिमेट कमिटी महापालिका आयुक्त - अध्यक्ष संबंधित विभागाचे अतिरिक्त महापालिका आयुक्त - सह अध्यक्ष शहर अभियंता - सदस्य सर्व मुख्य अभियंता - सदस्य सर्व अधिक्षक अभियंता व संबंधित उपआयुक्त - सदस्य अधिक्षक अभियंता (भवन) - सदस्य सचिव	रक्कम रुपये २५ कोटीच्या वर

सर्व कामांसाठी वर नमूद केल्याप्रमाणे पूर्वगणनपत्रक प्रस्तावांना मान्यता घेण्यात येवून ती प्रकरणे निविदा प्रकरणासोबत जोडण्यात यावीत. पूर्वगणनपत्रकांचे तपासणी व तांत्रिक मान्यतेबाबत यापूर्वी प्रसृत करण्यात आलेले या विषयीचे सर्व कार्यालयीन आदेश/परिपत्रके या आदेशान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत .

(विक्रम कुमार)
17/9 महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मआ/ड/२०६०
दिनांक : ०६/०८/२०१८

कार्यालयीन परिपत्रक :-

महापालिका आयुक्त कार्यालय पुणे महानगरपालिका जावक क्रमांक मआ/७७४ दि.१४ सप्टेंबर २०१७ नुसार नॉन डिएसआर आयटेम रेट करिता (Irrespective of per Unit Rate) मा.एस्टीमेट कमिटीची मान्यता घेणे बाबतचे परिपत्रकामध्ये राहील ही बाब नमूद करण्यात आलेली आहे. तरी सदर कार्यालयीन परिपत्रकाच्या अनुषंगाने यापुढे नॉन डिएसआर आयटेम दराकरीता खालील प्रमाणे मान्यता देण्यात यावी.

अ.क्र.	नॉन डिएसआर आयटेम प्रति युनिट दर	मान्यतेचे अधिकार
१	रु. १०,००० पर्यंत	खातेप्रमुख
२	रु. १०,००१ ते रु. १ लाख पर्यंत	शहर अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य अभियंता प्रकल्प, मुख्य अभियंता (पथ), मुख्य अभियंता (पाणीपुरवठा व मलनिःसारण प्रकल्प), अधीक्षक अभियंता (भवन), अधीक्षक अभियंता (विद्युत), महापालिका सहाय्यक आयुक्त (मोटार वाहन विभाग) या सदस्यांची समिती
३	रु. १ लाखापेक्षा जास्त	मा.तांत्रिक छाननी समिती

तसेच सदर दर मंजूर झाल्यानंतर सर्व खात्यांना सदर नॉन डिएसआर आयटेम प्रति युनिट दर कळविण्याची जबाबदारी संबंधित खातेप्रमुखांची राहील.तसेच सदर नॉन डी एस आर दर हा पुणे मनपाच्या दरपत्रकाचा भाग समजण्यात येईल.तसेच सदर दर पुणे मनपाच्या दरपत्रकात समाविष्ट करण्याची जबाबदारी खात्याची राहील.

(कुणाल कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रति

१) सर्व खातेप्रमुख
२) सह महापलिका आयुक्त /उप आयुक्त (परिमंडळ क्र.१ ते ५)
३) सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त

प्रत
अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि /ज/इ)

का.अ (कार्यकारी प्रकल्प)
उप अभि.

अधिक्षक अभियंता (विद्युत)
विद्युत विभाग
महानगरपालिका

पत्र क्र. - 6528
दि. 7/8/18

प्रत. अधि. अभि. (वि.) कार्यालय -

शहर अभियंता यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका, ९०४
जा.क्र. शअजा/ज/~~५५६~~
दिनांक : ~~२३/१/२०१८~~
१७/४/१८

कार्यालयीन आदेश

मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयीन परिपत्रक जा.क्र.मआ/द/२७६०, दि.६.०३.२०१८ अन्वये नॉन डीएसआर आयटेम रेट करिता शहर अभियंता यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार यापुढे रक्कम रु.१०,००१ ते रु.१,००,००० पर्यंतच्या नॉन डीएसआर आयटेम करिता सदर समितीची मान्यता घेण्यात येणार आहे.

तरी यापुढे नॉन डीएसआर आयटेम समितीकडे मान्यतेसाठी सादर होणारे विविध प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात यावेत.

१) स्थापत्य विषयक नॉन डीएसआर आयटेमचे प्रस्ताव मा.अधिक्षक अभियंता, भवन रचना विभाग या कार्यालयाकडून तपासून घेऊन त्यांचेकडील अभिप्रायासह नॉन डीएसआर आयटेम समितीकडे मान्यतेसाठी सादर करणे.

२) विद्युत, यांत्रिकी, उपकरण इ.विषयक नॉन डीएसआर आयटेमचे प्रस्ताव मा.मुख्य अभियंता, विद्युत या कार्यालयाकडून तपासून घेऊन त्यांचेकडील अभिप्रायासह नॉन डीएसआर आयटेम समितीकडे मान्यतेसाठी सादर करणे.

(प्रशांत वाघमारे)
शहर अभियंता,
पुणे महानगरपालिका.

प्रत : मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि/ज/इ)
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस् माहितीसाठी सादर-

प्रति,
१)सर्व खातेप्रमुख,
२) सह महापालिका आयुक्त/उप आयुक्त (परिमंडळ क्र.१ ते ५)
३) सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त,
पुणे महानगरपालिका.
यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी-

भवन रचना कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. ४३६
दिनांक 9/4/18

Scanned with OKEN Scanner